# वर्धा जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांक : 11.01.2019

## त्या सराईत गुन्हेगाराकडून पी.सी.आर. दरम्यान 4.20 लाखाचा माल जप्त

सन 2018 साली पो.स्टे. सेवाग्राम हद्दीत धन्वंतरी नगर, वैशाली नगर, कपीलवास्तु सोसायटी, सुतगिरणी लेऑउट, मसाळा, वरूड , सोहम नगर बरबडी या परिसरात सतत होणाऱ्या घरफोडया, चोऱ्या चा छडा लावण्यासाठी मा. पोलिस अधिक्षक डॉ. श्री. बसवराज तेली व अपर पोलिस अधिक्षक श्री. निखील पिंगळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या.

दिनांक 03.01.2018 रोजी स्था.गु.शा. येथील पथकाला मिळालेल्या माहितीप्रमाणे संशयीत इसम नामे संजय मुन, रा. नागपूर यांस ताब्यात घेतले व विचारपूस अंती पो.स्टे. सेवाग्राम येथे अप क्र. 664/2018 कलम 457, 380 भादवि मध्ये आरोपी संजय मधुकर मून वय 50 वर्ष रा. बेला ता. उमरेड जि. नागपूर यांस अटक करण्यात आली. त्याचा मा. न्यायालयाकडून दिनांक 04.01.2019 ते 11.01.2019 पावेतो पी.सी.आर. घेण्यात आला. तपासादरम्यान एकूण 13 गुन्हयातील चोरीस गेलेले अंदाजे 135 ग्रॅम सोने, 85 ग्रॅम चांदी असा एकूण 4,20,945/- रू चा मुद्देमाल कौशल्यपूर्णरित्या हस्तगत करण्यात आला.

सदरची कारवाई मा.पोलिस अधिक्षक डॉ. श्री.बसवराज तेली व अपर पोलिस अधिक्षक श्री.निखील पिंगळे यांचे मार्गदर्शनात व पोलिस निरीक्षक निलेश ब्राम्हणे यांचे निर्देशाप्रमाणे पोउपनि पंकज पवार, महेंद्र इंगळे, स.फौ.उदयसिंग बारवाल, नामदेव किटे, संजय देवरकर, पोहवा. परवेज खान, दिवाकर परिमल, नरेंद्र डहाके, हरीदास काकड, नापोशि. आनंद भस्मे, अमर लाखे, वैभव कट्रोजवार, अमित शुक्ला, सचिन खैरकार, कुलदिप टांकसाळे, निलेश कट्टोजवार, अक्षय राउत, आत्माराम भोयर, विलास लोहकरे, गणेश खवले, मपोशि सोनम कांबळे यांनी केली.

पोलीस अधिक्षक वर्धा जिल्हा